58
55

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

कार्यालय पोलिस स्टेशन शहर बीड

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** बीड शहर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0002 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/01/2019 00:10 बजे

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 05/01/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/01/2019

**Time From (वेळेपासून):** 17:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/01/2019 **Time (वेळ):** 23:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 028 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/01/2019 23:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दिप हस्पीटल समोरील सरकारी, दवाखानाचे भिंती लगत असलेल्या,चहाचे टपरी बीड येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आजिनाथ विठ्ठल काशीद

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1967 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाच लुचपतप्रतिबंधक विभाग,जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाच लुचपतप्रतिबंधक विभाग,जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9823142632**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शंकर हाच्यु राठोड | | | 1. पोस्टेशिवाजी नगर,बीड ,शिवाजीनगर, बीड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

सरकारतर्फे फिर्यादि कम्प-बीड दिनांक 05.01.2019 मी आजिनाथ विठ्ठल काशीद, वय 52 वर्षे पोलीस निरीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना.सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे पोलीस निरीक्षक पदावर दिनांक 03/06/2016 पासून कार्यरत आहे. आम्ही दिनांक 02.01.2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना कार्यालयात हजर असतांना वरीष्ठ कार्यालयाने आम्हास बीड येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार एकुन घेवुन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्या अनुशंगाने आम्ही दोन पंच व स्टफ सह बीड येथे येवुन तक्रारदार यांची भेट घेतली. तक्रारदार श्री.यशवंत बन्सीधर शिंदे, वय 39 वर्ष, व्यवसाय वकीली व लेखा परिक्षक रा. ईट ता.जि. बीड ह.मु.रुम नं.6,जे.एम.बी.कम्प्लेक्स,जिजामाता चौक,बीड यांनी तक्रार दिली की,मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व वकीली तसेच लेखा परिक्षक म्हणुन बीड येथे काम पहातो. मला दिनांक 21.12.2018 रोजी शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे जमादार श्री.शंकर राठोड यांनी पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड येथे बोलावुन घेतले व सांगीतले की तुमच्या विरुध्द कोर्टामध्ये चोरी केल्याची तक्रार आली आहे,गुन्हा दाखल करावयाचा नसेल तर तुम्ही मला 50,000/- रुपये द्या.त्यावर मी त्यांना चोरी वगैरे केली नसल्याचे सांगीतले तसेच माझ्या कडे पैसे नसल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस स्टेशन शिवाजी नगर,बिड येथे माझ्या विरुध्द कलम 380 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे जमादार श्री.शंकर राठोड यांचे कडे आहे. सदर गुन्हयात मला अटक करण्यात आली. मला दिनांक 22.12.2018 रोजी मा.कोर्टा समारे हजर करण्यात आले. मला दिनांक 24.12.2018 रोजी पावेतो पीसीआर मिळाली. मला अटक केल्या पासुन ते पीसीआर दरम्यान मला सतत अनेकदा जमादार श्री.शंकर राठोड यांनी तु मला 50,000/-रुपये दिले असते तर तुझ्या विरुध्द गुन्हा दाखल झाला नसता तुला त्रास झाला नसता.असे म्हणुन पैशाची मागणी केली. माझ्या कडुन माझा मोबाईल,माझी मो.सायकल व पेन ड्राईव्ह जप्त केला. तसेच जमादार श्री.शंकर राठोड हे तु अजुनही मला 20,000/- रुपये दे मी तुझी एमसीआर लिहीतो तुला गुन्हयात मदत करतो पैसे दिले नाही तर पुन्हा पीसीआर मागीन असे म्हणाले. त्यावर मी घाबरुन जावुन मी अटक व पीसीआर मध्ये असतांना दिनांक 23.12.2018 रोजी माझ्या घरचे लोक मला भेटायला आल्यावर त्यांचे हस्ते 20,000/- रुपये मागवले व जमादार श्री.शंकर राठोड यांना दिले. दिनांक 24.12.2018 रोजी मी बीड शहर पो.स्टे.चे लकअपमध्ये असतांना तपास कामी बाहेर काढुन जमादार श्री.राठोड़ मला म्हणाले की तु जर 20,000/- रुपये दिले तर मी कोर्टात हजर करतांना एमसीआर लिहीन नसता पीसीआर मागेल त्यावर मी जामीन झाल्यावर पैसे देईन असे म्हणालो. त्यानंतर त्यांनी मला दिनांक 24.12.2018 रोजी कोर्टात हजर केले.कोर्टाने मला एमसीआर करुन जामीनावर सोडले. माझी जमादार श्री.शंकर राठोड यांना लाच द्यायची इच्छा नाही. जमादार श्री.शंकर राठोड हे पोलीस असल्याने त्यांचे ओळखीचे लोक ला.प्र.वि. बीड येथे असु शकतात म्हणुन मी सदर बाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे वरीष्ठ अधिकारी यांचे सांगीतली व दुस-या जिल्हयातील अधिकारी कार्यवाही करण्या कामी पाठविण्या बाबत विनंती केली होती. आता आपण आल्याने मी आपल्या समोर तक्रार देत आहे. मी राहीलेली

लाचेची रक्कम 20,000/-रुपये जमादार श्री.शंकर राठोड यांना दिले नाही तर ते माझा मोबाईल,मो.सायकल व पेन ड्राईव्ह मला परत देणार नाहीत तसेच माझ्या विरुध्दचे दाखल गुन्हयात मला विनाकारण त्रास देतील. जमादार श्री.शंकर राठोड हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. तसेच जमादार श्री.शंकर राठोड यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. मी आज दिनांक 02.01.2019 रोजी शिवाजी नगर पोलीस स्टेशन बीड येथे जावुन जमादार श्री.शंकर राठोड यांना भेटुन माझा मोबाईल,मो.सायकल व पेन ड्राईव्ह परत करणे बाबत तसेच तपासात मदत करण्या बाबत विनंती करणार आहे. त्यावेळी जमादार श्री.शंकर राठोड यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडुन कार्यवाही करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.त्यावरुन सदर प्रकरणा मध्ये दिनांक 02.01.2019 रोजी तक्रारदार श्री.शिंदे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे शिवाजी नगर बीड येथे तक्रारदार व पंच यांना पाठविले असता जमादार श्री.राठोड यांची भेट झाली नाही. सरकार तर्फे फिर्याद श्री.काशीद पो.नि.यांची दिनांक 05.01.2019 पान..2परंतु फोनवर श्री.राठोड यांचे सोबत तक्रारदार यांचे बोलणे झाले असता श्री.राठोड यांनी दिनांक 03.01.2019 रोजी येवुन भेटण्याचे सांगीतल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा दिनांक 02.01.2019 रोजी करण्यात आला.त्यानंतर दिनांक 03.01.2019 रोजी आम्ही, दोन्ही पंच व स्टफसह पुन्हा बीड येथे येवुन तक्रारदार यांची भेट घेतली.शिवाजी नगर पे◌ालीस स्टेशनचे जमादार श्री.शंकर राठोड यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी तक्रारदार व पंच यांना व्हाईस रेकर्डरसह पाठवुन करण्यात आली. सदर पडताळणी मध्ये जमादार श्री.राठोड यांनी तक्रारदार यांचे कडे त्यांचे वरील कामासाठी 10,000/- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच आता काही आणले नाही का असे म्हणुन लाच स्विकारण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले. तसेच लाचेची रक्कम शनिवार दिनांक 05.01.2019 रोजी घेवुन येण्याचे सांगीतल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा 2 दिनांक 03.01.2019 रोजी करण्यात आला.त्यानंतर दिनांक 05.01.2018 रोजी आम्ही, दोन्ही पंच व स्टफसह पुन्हा बीड येथे येवुन तक्रारदार यांची भेट घेतली.शिवाजी नगर पे◌ालीस स्टेशनचे जमादार श्री.शंकर राठोड यांनी तक्रारदार यांचे कडे 10,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांनी त्यांना लाच म्हणुन देण्यासाठी 10,000/- रुपये हजर केले सदर ने◌ाटांना प्रात्यक्षीक दाखवुन अंथ्रासीन पावडर लावण्यात आली सदर बाबत सविस्तर सापळापुर्व पंचनामा दिनांक 05.01.2019 रोजी करण्यात आला.त्यानंतर दिनांक 05.01.2019 रोजी सापळापुर्व पंचनामा संपल्यानंतर पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड येथे परत आवश्यक त्या सुचना देवुन तक्रारदार श्री.शिंदे व पंच यं◌ाना व्हाईस रेकर्डर व लाचेच्या रक्कमेसह रवाना केले. त्यांचे मागेमागे सरकारी वाहनांने सापळा पथक पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड परिसरात पोहचुन पोलीस ठाणे शिवाजी नगर बीड परिसरात लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला. सदर ठिकाणी सापळा कार्यवाहीचे वेळी जमादार श्री.शंकर राठोड व तक्रारदार असे पोलीस स्टेशनचे बाहेर येवुन पोलीस स्टेशन पासुन जवळच असलेल्या दिप हस्पीटल समोरील सरकारी दवाखानाचे भिंती लगत असलेल्या चहाचे टपरी कडे गेले. सदर ठिकाणी चहा पिल्यानंतर जमादार श्री.शंकर राठोड यांनी तक्रारदार यांचे कडुन वरील कामासाठी सुमारे 17.45 वा लाचेची रक्कम 10,000/- रुपये स्विकारली असता त्यांना वाजता रंगेहाथ पकडण्यात आले. घटनास्थळी केलेल्या कार्यवाही मध्ये जमादार श्री.शंकर राठोड यांचे डाव्या हाताचे पाचही बोटांचे पेऱ्यावर व तळव्यावर तसेच अंगातील पन्टचे डाव्या खिशाचे तोंडावर व आतील बाजुस अ.पा.चे गुणधर्म आढळून आले. तसेच लाचेची रक्कम 10,000/- रुपये जमादार श्री.शंकर राठोड यांचे ताब्यातुन जप्त करण्यात आले.लाचेच्या नोटा 10,000/- रुपयावर ठिक ठिकाणी अ.पा.चे गुणधर्म आढळून आले. याबाबतचा सविस्तर घटनास्थळ पंचनामा घटनास्थळी व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय बीड येथे दिनांक 05.01.2019 रोजी करण्यात आला. आरोपी लोकसेवक श्री.शंकर हाच्यु राठोड,वय 54 वर्षे, पोहेक,ब.न.502 ने.पो.स्टे.शिवाजी नगर,बीड रा.मु.पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड ह.मु. बशीर गंज पोलीस कलनी,घर नं.एफ 23,बीड जि.बीड यांनी त्यांना मिळणारे कायदेशीर परिश्रमीकाखेरीज पारितोषण अथवा दान म्हणून 10,000/- रूपये लाचेची मागणी करुन 10,000/- रुपयाची लाच स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारीत 2018) अन्वये सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे. ( आजिनाथ व्ही.काशीद )पोलीस निरीक्षकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालनाकम्प- बीड

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे MANISHA BHAGWAT **Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): PSI **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): NITIN DAVLATARAO PAGAR

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): POBN84199